पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कप्रस/कावि/६२४/२०१४
दि. ४/०१/२०१४

प्रति,


मा.----------------------------
सदस्य/सदस्या
क प्रभाग समिती

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ८ /०१ /२०१४ रोजी दु. ३.०० वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ८/०१/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक-१०

दिनांक- ८ / ०१ /२०१४ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ८/०१/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक ४/१२ /२०१३ व दि. १८/१२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.९) सभावृत्तांत कायम करणे.


विषय क्रमांक १) **†›.**नितीन लांडगे व मा.नितीन काळजे यांचे पत्र- पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने भोसरी गावठाण प्रभागामध्ये कुस्ती आखाडयासमोर पाण्याच्या तलावाच्या बाजुने ब-याच वर्षापूर्वी छोटे छोटे गाळे उभारण्यात आले होते. सदर ठिकाणी मध्यंतरीच्या काळात पीएमपीएमएलचा बसस्टॉप करण्यात आलेला होता परंतु तो सध्या बंद केलेला आहे. सदर उभारलेले गाळे हे उभारलेल्या दिवसापासून ते आजतागायत वापरविना बंद अवस्थेत आहेत तसेच वापर नसल्याने सदर ठिकाणी ब-याचदा गैरप्रकार घडत असतात याठिकाणी भविष्यात गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. माहे एप्रिल २०१२ च्या मनपाच्या सर्वसाधारण सभेत सदर गाळे वाटप करण्याचा प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे तरी सदर गाळे निष्कासीत करुन उर्वरीत ठिकाणी भोसरी पोलीस स्टेशन अंतर्गत भोसरी पोलीस चौकी उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन दयावी व त्यासाठी आवश्यक असणारी डागडुजी व अनुषंगीक स्थापत्य विषय कामे करण्यात यावीत तसेच उर्वरीत मोकळया जागेत छोटेसे उदयान उभारुन सदर ठिकाणी जेष्ठ नागरीक महिला यांना बसण्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात यावी. तरी वरील वापराविना पडून असलेले गाळे निष्कासीत करुन पोलीस चौकी व उदयानासाठी आवश्यक असलेली कामे करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) **†›.**नितीन लांडगे व मा.नितीन काळजे यांचे पत्र-भोसरी गावठाण प्रभागाअंतर्गत सिताराम लोंढे उदयानाच्या प्रवेशद्वारासमोरील कोप-यावर मनपाचे एक **FRP** चे स्वच्छतागृह उभारलेले आहे. सदर ठिकाणी रस्ता रुंदीकरण झाल्याने तेथील निचरा व्यवस्थीत होत नसल्याने आजुबाजूच्या परिसरात सतत दुर्गंधी पसरलेली असते. मध्यंतरीच्या काळामध्ये मा.आरोग्य निरीक्षक व मा.आरोग्य अधिकारी क प्रभाग यांनी समक्ष पाहनी केलेली आहे तरी परिसरातील नागरिकांच्या मागणी वरुन सदर वापरात नसलेले स्वच्छतागृह त्वरीत निष्कासीत करुन तेथील परिसर दुर्गंधीमुक्त करण्यास तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) क प्रभाग कार्यक्षेत्रातील EPABX यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे या कामास व र.रु. ५,८०,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ४) मा.राहुल भोसले व मा.चंद्रकांत वाळके यांचे पत्र- नेहरुनगर मधील मुख्य चौकात पं.जवाहरलाल नेहरु यांचा पुतळा असुन, पुतळयासमोरील मुख्य चौकाला पं.जवाहरलाल नेहरु चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ५) मा.किरण मोटे व मा.जितेंद्र ननावरे यांचे पत्र- मुंबई पुणे महामार्गावरील कासारवाडी नाशिक फाटा येथे झालेल्या दुमजली उड्डाणपुलास " जे.आर.डी. टाटा उड्डाणपुल " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

क्र.कप्रस/कावि/६२४/२०१४
दि. ४/०१/२०१४